# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

२०२३

गुन्हे शाखा, नवी मुंबई  दिनांक १४.०३.२०२३

### कक्ष ३ गुन्हे शाखेकडुन घरफोडीच्या गुन्हयातील दोन आरोपी अटक करून गुन्हयातील रोख रक्कम व सोन्याचे दागीने असा एकुण ७,३०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत

-----------------------------------------------

नवी मुंबई पोलीस आयुक्तालया अंतर्गत तळोजा पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक ०१/०३/२०२३ रोजी फिर्यादी रामदास पाटील रा. नितळस गाव, तळोजा यांच्या राहते घरी अज्ञात चोरटयाने घरफोडी करून सुमारे रोख रक्कम व सोन्याचे गंठण असा एकुण ७,३०,०००/- रु कि.चा मुद्देमाल चोरी झाले बाबत दिलेल्या तक्रारीवरून तळोजा पो. ठाणे गु.र.नं ६७/२०२३ भा.द.वि कलम ४५७, ३८० प्रमाणे अज्ञात चोरटयाविरूध्द गुन्हा नोंद होता.

सदर अनुषंगाने नवी मुंबई आयुक्तालयाच्या हद्दीमधील घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत मा. पोलीस आयुक्त सो, श्री. मिलिंद भारंबे साहेब, मा. पोलीस सह आयुक्त सो, श्री. संजय मोहिते साहेब, मा. अपर पोलीस आयुक्त सो, गुन्हे, श्री. महेश घुर्ये साहेब, मा. पोलीस उप आयुक्त सो, गुन्हे श्री. अमित काळे साहेब, यांनी दिलेल्या सूचना व आदेशाप्रमाणे मा. सहा. पोलीस आयुक्त सो, श्री. विनायक वस्त साहेब, गुन्हे यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष ३ गुन्हे शाखेकडून घरफोडीचे गुन्हयांचा समांतर तपास सुरू होता. दरम्यान तळोजा पोलीस ठाणे गु.र.नं. ६७/२०२३ भा.द.वि कलम ४५७, ३८० या गुन्ह्याचे घटनास्थळी भेट देऊन फिर्यादी व साक्षीदार यांच्याकडे मिळालेल्या माहितीच्या आधारे परिसरातील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करून, ठिक ठिकाणचा डंपडाटा घेवून केलेल्या तांत्रिक तपासामध्ये मिळालेल्या माहितीवरून कक्ष ३ गुन्हे शाखेचे तपास पथकाने मुंबई, ठाणे, मीरा-भाईंदर या परिसरात आरोपींचा शोध सुरू होता. सदर गुन्हयाचे तपासामध्ये कक्ष ३ गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी नामे १) सुमित भगवान शेळके वय २४ रा. गांधीपाडा अलिबाग, सध्या रा. लक्ष्मी कसबे चाळ, बैल बाजार, सहयोग नगर वाडिया ईस्टेट जवळ कुर्ला पश्चीम, मुंबई २) श्रीनाथ सदाशिव वाघमारे वय २५ रा. महेंद्ररंगी शिवचल्लेश्वर मंदिराचे बाजुला ता. अक्कलकोट जि. सोलापुर सध्या रा. शहिद भगतसिंग नगर, रेल्वे गेट क्र ५, वडाळा पुर्व, मुंबई यांना दिनांक १०/०३/२०२३ रोजी अटक करून तपास केला असता सदरचा गुन्हा उघडकिस आलेला आहे. नमुद आरोपीत यांना दिनांक १५/०३/२०२३ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे.

**आरोपींकडुन हस्तगत मालमत्ता -**

| अ.क्र | किंमत | मुद्देमालाचे वर्णन |
|---|---|---|
| १ | ४,३०,०००/- | ५००/- रु दराच्या भारतीय चलनी नोटा (संख्या ८६०) |
| २ | २,८०,०००/- | एक सोन्याचे गंठण |
| ३ | २०,०००/- | २ मोबाईल |
| | **७,३०,०००/-** | **एकुण किंमत** |

नमूद आरोपींचा पूर्व इतिहास पडताळला असता आरोपी क्रमांक १ याचेवर १) नागोठणे पो.ठाणे ७७/२१, २) सातपाटी पो. ठाणे २१/१९, ३) केलवा पो. ठाणे ०३/२१. ४) अलिबाग पो. ठाणे १३८/१७, ५. नागोठणे पो. ठाणे ८२/२१, ६) अलिबाग पो. ठाणे १४०/१७ ७) साठपाठी सागरी पो. ठाणे ८) दिघी सागरी पो.ठाणे ४७/२१, या प्रमाणे घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत.

सदर गुन्हयाचे गुन्हा उघडकिस आणणे व तपासामध्ये वपोनि विश्वनाथ कोळेकर, सपोनि ईशान खरोटे, सपोनि सागर पवार, पोउपनि/सुशील मोरे, अंमलदार पोहवा/९७४ मोरे, पोहवा/८५ बावा, पोहवा/१२५६ पवार, पोहवा/१८०६ पाटील (तांत्रीक तपास), पोहवा/२०८७ धनवटे, पोहवा/२०९१ जेजुरकर, पोहवा/२२२५ बोरसे, पोहवा/२३८६ जोशी, पोना/२८३६ मोरे, पोना/६०३ सोनवलकर यांनी सहभाग घेवुन महत्वपुर्ण कामगिरी बजावलेली आहे.


मुंबई पोलीस आयुक्तालय
गुन्हे शाखा
कक्ष-३